विद्यार्थ्यांच्या उज्जवल भविष्यासाठी 'प्रतिष्ठा सोहळचाचे आयोजन राजस्थान कॉन्व्हेट मध्ये करण्यात आले.

रिसोड वार्ता,

स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांच्या उज्जवल भविष्याकरिता त्यांच्या सर्वांगिण विकासाकरिता शिक्षक व पालकांनी जागृत राहुन कार्य करावे असे अवाहन शाळा समितिचे अध्यक्ष श्री. पुरूषोत्तम बियाणी यांनी य 'प्रष्ठिा सोहळा च्या अध्यक्ष स्थानावरून त्यांनी वरिल विचार मांडले.

हचा प्रतिष्ठा सोहळा म्हणजे शाळेमध्ये लोकशाही पध्दतिने निवडणूक घेवून निवडुन आलेले उमेदवार यांच्या जबाबदारी देवून त्यांनी त्यांचे कार्य प्रामाणिकपणे पूर्ण करणे. व एक आदर्श नागरिक बनन्याचा प्रयत्न करणे या नव निर्वाचित विद्यार्थी परिषदेचा सत्कार सन्मान मुख्यअतिथिच्या हस्ते करणे होय.

आजच्या या कार्यक्रमाला शाळा समितीचे अध्यक्ष श्री पुरूषोत्तम बियाणी मुख्य अतिथि श्री.राजेंद्र पाटील,ठाणेदार पोलिस स्टेशन रिसोड, केंद्र प्रमुख श्रीमती मंजुषा कळसे, राजस्थान मराठी शाळेचे सभापती श्री. राजुभाऊ रूहटिया, वाशिम अर्बन बँक शाखा रिसोड चे मॅनेजर श्री. गीरि सर उपस्थित होते. त्याच शाळेचे मुख्याध्यापक श्री.जोशी अरिकट जोस, उपमुख्याध्यापक श्री.प्रदिप सराफ, पि.आर.ओ श्री.ओंकार पुरी बरोबर विद्यार्थ्यी पालक व शिक्षक मोठच संख्येने उपस्थित होते. शाळेच्या भव्य मैदानात मोठचा प्रमाणात हा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हचा कार्यक्रमाची सुरूवात संगितमय शालेय परिपाठाने करण्यात आली. वर्ग ४ थी व ५ वी च्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीताचे गायन केले व पुष्पगुच्छ देवून अतिथिचे स्वागत करण्यात आले, त्यानंतर प्रदीप सराफ सर यांनी हचा कार्यक्रमाचा उद्द्देश काय असतो व त्याचे महत्व आपल्या अवेरनेस भाषणातू स्पष्ट कल्पणा दिली. त्यानंतर निवडून आलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांना सन्मान चिन्ह देवून त्यांचा गौरव करण्यात आला.

यामध्ये, हेड बॉय:- आमन शेख ख्वॉजा, हेड गर्ल:- वैष्णवी दिपक साबळे डिसीप्लीन इन्चार्ज:- वैष्णवी खरबळ, स्पोर्ट इन्चार्ज वैष्णीवी गाताडे, हाऊस कॅप्टन:- यश पवार,

समीर शेख, सौरभ इंगोले, सोहेल शेख, हाऊस व्हाइस कॅप्टन:- पुनम मानतोडे, चंचल हेंबाडे ,तनया वाघ, सलोनी इंगोले यांनी मार्चपास करत सर्व अतिथितींना सलामी देत शालेय मैदानाला एक फेरी मारली व त्यांच्या हातामध्ये असलेले विविध रंगाचे ध्वज त्यांनी आपल्या हाऊस प्रमुख असलेल्या शिकांनकडे हँड ओव्हर केले. त्यांनर अतिथिंनी नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेस जवाबदारी देऊन त्यांच्या कार्याची त्यांना जाणिव करून देवून त्यांना या गोष्टिंशी प्रामणिक राहण्याची शपथ दिली. भविष्यात आदर्श नागरिक शिक्षणासोबत होण्याकरिता शुभेच्छा दिल्या.

सर्व अतिथिनी सर्व निवडून आलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व त्यांचे कौतुक केले वर्ग ३री, ४थी ते ५वी विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट नृत्य सादर केले त्याबद्दल त्यांचे कौतुक केले,

कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री. ॲन्जोले सर व यास्मीन मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रिन्सिल जोशी सर यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यी यांनी अथक परिश्रम घेतले.